5910

2 8 JUL 1963

● ● लोकशाही शासनाची दोन गृहीत तत्त्वे आहेत. जेथें एकमत होत नसेल तेथें बहुमताच्या निर्णयानुसार कारभार चालवावा आणि ज्यांना तो निर्णय चुकीचा वाटेल त्यांनीं तसे म्हणून, व आपल्या बाजूने बहुमत करुन घेऊन तो निर्णय बदलून घ्यावा. लोकशाहीच्या या कल्पनेनुसार भारतात राज्यकारभार चालण्यासाठीं देशातील सर्व लोकशाही विरोधी पक्षांनी एकत्र येऊन राष्ट्रीय लोकशाही पक्ष स्थापन केला पाहिजे. जोंवर रशियांत साम्यवादी हुकुमशाही आहे व जगांतील सर्व देशांत आपले पंचमस्तंभी असावेत असा त्यांचा आग्रह आहे तोंवर भारतातहि द्विपक्षीय लोकशाही निर्माण होणें अशक्य आहे. परंतु त्रिपक्षीय लोकशाही आपल्या देशात निर्माण होण्यास हरकत नसावी असें स्वतंत्र पक्षाचें मत आहे. पण हें कसें होणार? ● ●

पक्ष सत्तारूढ पक्षाची जागा भरून काढू शकेल, सरकारची जबाबदारी उचलू शकेल, असा खऱ्या अर्थाने विरोधी पक्ष देशात अस्तित्वातच नाही असे कबूल करणे भागच आहे. आपल्या लोकशाहीतील ही मोठी उणीव कशी भरून काढावयाची हाच खरा प्रश्न आहे.

**राष्ट्रीय लोकशाही पक्ष**

देशातील सर्व लोकशाही विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जर 'राष्ट्रीय लोकशाही पक्ष' स्थापन केला तर हा प्रश्न

# विरोधी-पक्ष एकीकरणाचा मार्ग कोणता?

वेगवेगळी ध्येये व हितसंबंध असणाऱ्या व्यक्ति व गट कोणत्याहि समाजात नेहमीच असतात. त्यापैकीं अनेक हितसंबंध परस्पर विरोधीहि असतात. अर्थातच ज्यांचीं मते प्रस्थापित सरकारच्या मतांशी जुळती नाहीत त्यांनी जनतेचें मन वळवून आपल्या मताप्रमाणें कारभार करणारे सरकार सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करावा हें रास्तच असतें. लोकशाहीत सत्तारूढ पक्षाइतकेंच विरोधी पक्षाला महत्त्व असते त्याचें कारण हेंच आहे. सत्तारूढ पक्षाच्या व विरोधी पक्षाच्या ध्येयवादात एकंदर जनतेच्या आशा-आकांक्षांचें प्रतिबिंब दिसत असते. कोणत्या मतामागे किती माणसे आहेत याला फक्त तात्कालिकच महत्त्व असते. कारण आज जी मते थोड्याच लोकांना पटतात ती उद्या बहुमताला पटण्याचा

बाजूने बहुमत करून घेऊन ते निर्णय बदलून घेण्याचा अधिकार लोकशाहीच्या कल्पनेंत अनस्यूत असतो. त्यामुळें काल जे बहुमतात असतील ते उद्या अल्पमतात जाण्याचा व अल्पमतात असलेले बहुमतानें सत्तेवर येण्याचा लोकशाहीत नेहमीच संभव असतो.

**अल्पमताचे रखवालदार**

लोकशाहीच्या या कल्पनेनुसार विरोधी पक्ष हे अल्पमताच्या हितसंबंधांचे रखवालदार असतात व बहुमत-

स्वराज्य मिळाल्यानंतर गांधीजींनी कांग्रेस पक्ष बरखास्त करावा व कांग्रेसी सदस्यांना दोन पक्ष स्थापण्यास प्रवृत्त करावे असे सुचविले होते. परंतु कांग्रेसनें हा सल्ला मानला नाहीं. व त्यामुळें भारतात दोन तुल्यबल पक्षांनी युक्त लोकशाही शासनयंत्रणा निर्माण झाली नाहीं. जोंवर रशियांत साम्यवादी हुकूमशाही आहे व जगांतील



एका दिवसांत सुटूं शकेल. परंतु वस्तुत असे काही घडून येण्याची शक्यता नजिकच्या भविष्यकाळांत दिसत नाही. मात्र तरीहि त्या दिशेनें प्रयत्न चालूच राहिले पाहिजेत. दुसरा एक मार्ग आचार्य कृपलानी यांनी सुचविला आहे. किमान कार्यक्रमाच्या आधारें विरोधी पक्षांनी एकत्र यावें असे त्याचें मत आहे. परंतु विरोधी पक्षांतील दोन मोठ्या पक्षांनी कृपलानींच्या या मताला प्रतिकूल अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्याने या मार्गानेंहि तावडतोब यश मिळण्याची फारशी आशा दिसत नाही.

**एकमेव उपाय**

लोकशाही विरोधी पक्षांनी ज्या मुद्यांवर त्यांचे एकमत असेल अशा विशिष्ट मुद्यांचे बाबतींत एकत्र यावें. व एरवी प्रत्येकानें आपआपल्या मार्गानें जावें पण शक्य तर एकमेकांचे

बाटणाऱ्या अमूर्तेतून निर्माण झालें असावें. यॉर्कशायर परगण्यांतील हडर्सफील्ड या गांवांतील एका केमिस्टाचा हा मुलगा लहानपणापासूनच बुद्धिमत्तेची चमक दाखवीत होता. रस्त्यानें चालतांना जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींच्या नंबरांचे वर्गमूळ शोधून काढ-

आहे आधार न घेता, हुजूर पक्षाच्या गेल्या अकरा वर्षांतील अर्थसंकल्पांतील आयव्ययाचे आकडे त्यानें घडाघड बोलून दाखविले.

**नायचा छोटा कुत्रा**

पण बौद्धिक तयारी हें नेतृत्वाचें एक अंग झालें. निष्ठा हें त्याचें दुसरें तितकेंच महत्त्वाचें अंग आहे. हॅरॉल्ड विल्सनजवळ त्याचा आतांपर्यंत अभावच होता असा त्याच्या



खुद्द विन्स्टन चर्चिलनेंदेखील असा धारेपालट केला होता आणि त्यामुळें हुजूरपक्षानें त्याला बराच काळपर्यंत दोन हात दूर ठेवले होते.

**विल्सनचें व्यक्तिचित्र**

## हॅरॉल्ड विल्सन

सभासदांशीं चर्चा करण्यास मी सदैव तयार आहे असें सर्व सभासदांना त्या